Lokmat 09.04.20

# भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यामध्ये सॅनिटायझर कमानीतून प्रवेश

लोकमत न्यूज नेटवर्क

धनकवडी : कोरोनाचा मुकाबला करण्यासाठी भारती विद्यापीठ पोलीस ठाणे सज्ज झाले आहे. पोलीस ठाण्याच्या प्रवेशद्वारासमोर सॅनिटायझर कमानीची उभारणी येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीवर अत्याधुनिक मशिनद्वारे जंतुनाशक फवारण्यात येत आहे. निर्जंतुकीकरण झाल्यावरच प्रवेश करण्यात येत असल्याची माहिती पुणे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विष्णू ताम्हाणे यांनी 'लोकमत'शी बोलताना दिली.

मागील दोन-तीन दिवसांपासून शहरात कोरोनाचा संसर्ग वाढला आहे. खबरदारी म्हणून पोलीस ठाण्याच्यावतीने हा उपक्रम सुरू केला आहे. ठाणे अंमलदार यांच्या खुर्चीजवळ असलेले बटण ऑन केले, की येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीच्या अंगावर चोहो बाजूंनी औषधाची फवारणी होते. पोलिसांना मास्क, सॅनिटायझर, साबण आदी वस्तू पुरविण्यात आल्या आहेत. स्वत:च्या आरोग्याची काळजी घेण्यासंदर्भात त्यांना विशेष ही सूचना देण्यात आल्या आहेत.

कोरोनाचा संसर्ग आणि फैलाव



भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यामध्ये सॅनिटायझर्स बोगद्यातून प्रवेश करताना नागरिक.

रोखण्यासंदर्भात क्वारंटाईन केलेल्या व्यक्तींकडून सुरुवातीला योग्य प्रतिसाद मिळत नव्हता. मात्र बाहेरून ठाण्याच्या हद्दीत आलेल्या नागरिकांना स्वत:ने 'होम क्वारंटाईन' करण्यात आले आहे.

कोरोनाविरोधातील लढाईसाठी पोलीस ठाणे आवश्यक ती सर्व काळजी घेत असून, नागरिकांनी आपल्या घरातच थांबून संसर्गाद्वारे पसरणाऱ्या या आजाराची साखळी खंडित करण्यात आपले योगदान द्यावे आणि आपल्या स्वत:च्या आणि इतरांच्या आरोग्याचे रक्षण करावे, असे ताम्हाणे म्हणाले.

Lokmat 13.04.20



पासलकर पुलाखाली पोलिसांसाठी निर्जंतुकीकरण कक्ष उभारला आहे.

# नाकाबंदीच्या ठिकाणी निर्जंतुकीकरण कक्ष

## कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांची काळजी

लोकमत न्यूज नेटवर्क

धायरी : पोलीस दलातील अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी वडगाव बुद्रुक येथील वीर बाजी पासलकर पुलाखालील नाकाबंदीच्या ठिकाणी निर्जंतुकीकरण कक्ष उभारण्यात आला आहे.

कोरोनाशी लढा देत देशभरातले डॉक्टर, नर्स, वॉर्डबॉय इतर आरोग्य कर्मचारी रात्रंदिवस राबत आहेत. आरोग्य कर्मचाऱ्यांबरोबरच पोलीसही तितक्याच ताकदीने कोरोनाचा मुकाबला करण्यासाठी रस्त्यावर उतरले आहेत. कोरोना विषाणूचा वाढता संसर्ग पाहता पोलिसांच्या आरोग्याच्या दृष्टीने नाकाबंदीच्या ठिकाणी निर्जंतुकीकरण कक्ष उभारण्यात आला असल्याची माहिती सिंहगड रस्ता पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक नंदकिशोर शेळके यांनी दिली.

निर्जंतुकीकरण कक्ष उभारण्यासाठी मंजुनाथ वस्त्रद, सचिन वांजळे, संपत चरवड, रोहिदास गोरड, सोमलिंगैया स्वामी, अमोल व्यवहारे, शैलेश निपुणगे यांनी मदत केली.

Lokmat 30.04.20

# कोरोनाविरुद्धच्या लढ्यात पोलिसांना मिळणार 'रिवार्ड'

## पोलीस कल्याण निधीतून १० हजार देणार

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : कोरोनाचा संसर्ग टाळण्यासाठी जिवावर उदार होऊन बंदोबस्तात काम करणाऱ्या पोलीस कर्मचाऱ्यांसाठी 'रिवार्ड' दिला जाणार आहे. यात ड्युटीवर असताना दुर्दैवाने संबंधित पोलीस कर्मचाऱ्याला कोरोनाचा संसर्ग झाल्यास त्याला दहा हजार रुपये रिवार्ड म्हणून दिले जाणार आहेत. या रिवार्डची रक्कम पोलीस कल्याण निधीतून त्यांच्या खात्यात वर्ग केली जाणार असून, आगाऊ रक्कम म्हणून एक लाख रुपये संबंधित पोलिसांना बिनव्याजी दिले जाणार आहे. अशी घोषणा पोलीस सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांनी केली. आत्तापर्यंत शहर पोलीस दलात आठजणांना कोरोनाची लागण झाली आहे, त्या सर्वांना हा रिवार्ड देण्यात येणार आहे.

याबाबत अधिक माहिती देताना डॉ. शिसवे यांनी सांगितले, कोरोना संकटाच्या काळात पोलीस लॉकडाउनची अंमलबजावणी करत आहेत. कर्तव्य पार पाडताना पोलीस कर्मचाऱ्यांचा कोरोनाबाधितांशी अनेकदा संपर्क येतो, या वेळी योग्य ती काळजी घेतली जाते आहे. मात्र तरी



देखील दुर्दैवाने काही पोलीस कर्मचाऱ्यांना कोरोनाची लागण झाल्याचे दिसून आले आहे. या कर्मचाऱ्यांना योग्य ते तत्काळ उपचार मिळावेत म्हणून शहरातील काही रुग्णालयांत पोलिसांसाठी बेड आरक्षित करण्यात आले आहेत. यापुढे जर दुर्दैवाने एखाद्या कर्मचाऱ्याला कोरोनाची लागण झाली तर एक कुटुंबाचा घटक म्हणून, एक पोलिसांची टीम कर्मचाऱ्याला क्लिनिंगसाठी घेऊन जाईल व योग्य उपचार कसे मिळतील याचा लक्ष ठेवेल. सर्वांत महत्त्वाचे धोरण हे आहे की, कर्तव्य पार पाडत असताना पोलिसांना कोरोनाचा प्रादुर्भाव होऊ नये, तो टाळण्यासाठी सर्व प्रकारच्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहे.

Police Welfare

पुणे पोलीस
Pune Police

**Lokmat 12.04.20**

# पोलीस कुटुंबीयांना वस्तूंच्या किटचे वाटप

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : सर्वसामान्य पुणेकर नागरिकांसाठी कार्यरत पुणे पोलिसांच्या कुटुंबीयांना पुणे पोलिसांनी मोठा दिलासा आहे. पोलीस वसाहतीत जाऊन तिथे जीवनावश्यक वस्तूंचे वाटप सुरू केले आहे. बाजारपेठेच्या तुलनेत अतिशय माफक दरात त्यांना या वस्तू उपलब्ध करून दिल्या आहेत. कोरोनाला कुठलाही धर्म कळत नाही. तुम्ही पोलीस आहात हे त्याला समजत नाही. तेव्हा सर्वांनी काळजी घ्यावी. असे आवाहन शहराचे सहआयुक्त डॉ. रवींद्र शिसवे यांनी पोलिसांना केले आहे.

जीवनावश्यक सेवेचे किट वाजवी दरात उपलब्ध करून देण्यात आले आहे. हे किट देताना एका कुटुंबातील ४ व्यक्तींना किमान ८ ते १० दिवस पुरेल एवढे साहित्य त्यात समाविष्ट करण्यात आले आहे. बाजारभावापेक्षा नाममात्र दरात पोलिसांना हे किट उपलब्ध होणार आहे. त्यासाठी व्यापाऱ्यांकडून जीवनावश्यक वस्तूसाठी आवश्यक ती सबसिडी घेण्यात आली आहे. यामुळे त्या वस्तू वाजवी दरात उपलब्ध करून देणे शक्य होणार आहे.

याविषयी अधिक माहिती देताना पुणे शहराचे पोलीस सह आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे म्हणाले, ज्या पोलिसांना कामामुळे अत्यावश्यक सेवेची खरेदी करता येणे शक्य होत नाही त्यांच्याकरिता जीवनावश्यक वस्तू उपलब्ध करून दिल्या आहेत. त्यानिमित्ताने पोलीस कुटुंबातील सदस्यांना दिलासा मिळणार आहे. शुक्रवारी शहरातील प्रत्येक पोलिसांना एक किलो कांदा, एक किलो बटाटा याचे वाटप केले. पोलीस कुटुंबीयांना याचे वाटप करण्यात आले.

**Lokmat 22.04.20**

# कृष्णकुमार गोयल फाउंडेशनकडून पोलिसांना फेस मास्क

## संपूर्ण चेहऱ्याची सुरक्षा : रोज धुता येतो

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : पुणे शहरातील रस्त्यावर कर्तव्य बजावणारे पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना कृष्णकुमार गोयल फाउंडेशनच्या वतीने फेस मास्कचे वाटप केले. सध्या शहरात अनेक भाग सील केले आहेत. पोलिसांना असलेला कोरोनाचा धोका ओळखून कृष्णकुमार गोयल फाउंडेशनच्या वतीने खास इंजिनिअरकडून डिझाइन केलेले फेस मास्क पोलिसांना कृष्णकुमार गोयल अध्यक्ष, दुर्योधन भापकर, उपाध्यक्ष-खडकी बोर्ड, राजेंद्र भुतडा यांच्या हस्ते वितरीत करण्यात आले. अमोल जाधव, हर्षल भुतडा, शुभम शेंडे, प्रतीक मास्कर, चेतन भुतडा, अभिजित परदेशी यावेळी उपस्थित होते.

फेसमास्कमुळे संपूर्ण चेहरा झाकला जातो. डोळे, नाक, तोंड यावर कोरोना संसर्ग होऊ शकत नाही. ह्या खोळनी राहण्यासाठी व्यवस्था आहे. महत्त्वाचे म्हणजे हा मास्क धोऊन वापरता येणार आहे. औंध रोड, बोपोडी, खडकी, मरिआई गेट, पाटील स्टेट, जंगली महाराज, शिमला ऑफिस, संभाजी बाबा चौक, विद्यापीठ चौक, सिम्बायोसिस चौक आदी ठिकाणी ५०० मास्कचे वाटप केले.



कृष्णकुमार गोयल फाउंडेशनच्या वतीने पोलिसांना फेस मास्क वाटप केले.



दिवस-रात्र पुणेकरांच्या रक्षणासाठी स्वत:च्या कुटुंबाला विसरून मेहनत घेणाऱ्या पोलिसांसाठी कृष्णकुमार गोयल फाउंडेशनकडून मदतीचा हात म्हणून फेसमास्कचे वाटप केले. हे आम्ही आमचे कर्तव्य समजतो. येथून पुढील काळातही पोलिसांसाठी विविध उपक्रम राबवू.

- कृष्णकुमार गोयल, अध्यक्ष कोहिनूर ग्रुप

**Loksatta 06.04.20**

# पोलीस कर्मचाऱ्याचा मृत्यू झाल्यास पाच लाखांच्या मदतीचा निर्णय

## करोनामुळे पोलीस सोसायटीकडून कर्जमाफीही जाहीर

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे: दी पुना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑप क्रेडिट सोसायटीचा सभासद असलेल्या पोलीस कर्मचाऱ्याचा करोनामुळे मृत्यू झाल्यास त्याच्या कुटुंबीयांना सोसायटीकडून पाच लाखांची मदत देण्याचा निर्णय घेण्यात आला. पोलीस सोसायटीचे शहर आणि जिल्ह्यातील १३ हजार पोलीस कर्मचारी सदस्य आहेत.

सोसायटीकडून त्या पोलीस कर्मचाऱ्याने घेतलेले कर्जही माफ करण्यात येणार आहे तसेच त्याचा अंत्यविधीचा खर्च सोसायटी करणार आहे. अंत्यविधीसाठी सोसायटीकडून कुटुंबीयांना दहा हजार रुपयांची मदत करण्यात येणार आहे. करोनामुळे मृत्यू झाल्यास सोसायटीचे सभासद असलेल्या पोलीस कर्मचाऱ्याच्या समभागाची रक्कम देखील परत केली जाणार आहे. करोनाचा संसर्गाला अटकाव घालण्यासाठी प्रशासनाकडून उपाययोजना हाती घेण्यात आल्या आहेत. अशा परिस्थितीत पोलीस कायदा-सुव्यवस्था सांभाळणे तसेच सामान्यांना मदत करण्याचे काम करत आहे. पोलिसांच्या कामाचे स्वरूप वेगळे आहे. तो नागरिकांच्या थेट संपर्कात असतो. बंदोबस्तात असलेल्या पोलिसाला करोनाचा संसर्ग झाल्यास त्याचा विमा सरकारकडून उतरविण्याचा निर्णय घेण्यात आला. पोलीस सोसायटीचे सभासद असलेल्या पोलीस कर्मचाऱ्याचा मृत्यु झाल्यास त्याच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देण्याचा निर्णय संचालक मंडळाने घेतला आहे, अशी माहिती दी पूना डिस्ट्रिक्ट पोलीस को-ऑप क्रेडीट सोसायटीचे अध्यक्ष प्रशांत शिंदे यांनी दिली.

पुणे शहर, पिंपरी शहर, ग्रामीण पोलीस, राज्य गुन्हे अन्वेषण विभाग (सीआयडी), लाचलुचपत प्रतिबंधक विभाग (एसीबी) बिनतारी संदेश विभाग (वायरलेस) अशा घटकात कार्यरत असलेले १३ हजार पोलीस सोसायटीचे सभासद आहेत. सोसायटीकडून सभासद असलेल्या पोलिसांना त्वरित बारा लाखांचे कर्ज मंजूर करण्यात येते. एखाद्या पोलिसाचा कर्तव्यावर असताना मृत्यू झाल्यास त्याला कर्जमाफ करण्यात येते, असे शिंदे यांनी नमुद केले.

### कर्जाचे हप्ते दोन महिने स्थगित

शासकीय कर्मचाऱ्यांना दोन टप्प्यात वेतन देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे पोलीस सोसायटीकडून कर्ज घेतलेल्या पोलिसांचे पुढील दोन महिन्यांचे हप्ते स्थगित करण्यात आले आहेत. कर्ज घेणारा पोलीस पुढील दोन महिन्यानंतर त्याच्या सोयीने हप्ते भरू शकतो, असे सोसायटीचे अध्यक्ष प्रशांत शिंदे यांनी नमूद केले.

**Mata 05.04.20**



पोलिसांसाठी राहुट्या

**Lokasatta 14.04.20**

# विद्या सहकारी बँकेतर्फे शहरात ४० ठिकाणी तंबू



उन्हात गस्त घालणाऱ्या पोलीस अधिकारी, कर्मचाऱ्यांसाठी विद्या सहकारी बँकेने शहरात ४० ठिकाणी मांडववजा तंबूंची व्यवस्था केली आहे.

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**पुणे :** करोनाच्या पार्श्वभूमीवर शहरातील सर्व भागांमध्ये भर उन्हात गस्त घालणाऱ्या पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी विद्या सहकारी बँकेने शहरातील पाचही परिमंडळांच्या हद्दीत मिळून ४० ठिकाणी मांडववजा तंबूंची व्यवस्था केली आहे. त्यामुळे उन्हात कर्तव्यावर असणाऱ्या पोलिसांची सोय झाली आहे.

नागरिकांच्या हितासाठी स्वतःचा जीव धोक्यात घालून, आपल्या कुटुंबीयांपासून दूर राहून या अडचणीच्या काळात बंदोबस्तावर असलेले पोलीस कर्मचारी आपले कर्तव्य बजावत आहेत. ज्येष्ठ नागरिकांना मदत, अपघातग्रस्तांना स्वतःच्या वाहनातून रुग्णालयात पोहोचवणे, निराधारांना अन्नपुरवठा करणे यांसारखी कामेही करत आहेत.

अशा परिस्थितीत पोलिसांसाठी विद्या सहकारी बँकेने ४० ठिकाणी तंबू उभे केले आहेत. हे तंबू पोलीस चौकीप्रमाणे वापरता येत असल्याने बंदोबस्तासाठी उपयोगी ठरत असल्याचे बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुभाष देवधर यांनी सांगितले.

**Mata 11.04.20**




बांधकाम व्यावसायिक विशाल गोखले यांनी कोथरूड पोलिस ठाण्यात साकारलेले सॅनिटायझेशन चेंबर.

# पोलिस ठाण्यांमध्ये निर्जंतुकीकरण कक्ष

**पुणे :** पोलिस दलातील कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी बांधकाम व्यावसायिक विशाल गोखले यांनी शहरातील विविध पोलिस ठाण्यांमध्ये निर्जंतुकीकरण कक्षाची (सॅनिटायझेशन चेंबर) साकारले आहेत. पौड रस्त्यावरील कोथरूड पोलिस स्टेशनमधील सॅनिटायझेशन चेंबर सुरू केले, त्या वेळी महापौर मुरलीधर मोहोळ आणि पोलिस उपायुक्त पौर्णिमा गायकवाड, कोथरूड पोलिस स्टेशनच्या पोलिस निरीक्षक प्रतिभा जोशी आणि बांधकाम व्यावसायिक विशाल गोखले हेदेखील उपस्थित होते.

पहिल्या टप्प्यात शिवाजीनगर, प्रभात रस्ता, डेक्कन जिमखाना, पौड रस्ता, कोथरूड, अलंकार पोलीस चौकी व वारजे येथील पोलिस ठाण्यांबाहेर सॅनिटायझेशन चेंबर उभारण्यात आले आहेत. स्वतःचा जीव धोक्यात घालून, चोख कर्तव्य बजाविणाऱ्या पोलिसांसाठी काही करता आल्याचा आनंद आहे, असे गोखले यांनी सांगितले. येत्या काही दिवसांत अंदाजे २० पोलिस चौक्यांमध्ये ही सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

**Mata 13.04.20**

# पोलिस कर्मचाऱ्यांना घरपोच वस्तू

**पुणे :** नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पोलिस प्रशासन दिवस-रात्र आपले कर्तव्य बजावत आहे. कर्मचाऱ्यांना आपल्या कामामुळे घराकडे लक्ष देण्यासाठी वेळ मिळत नाही. त्यामुळे पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी पोलिसांच्या वसाहतीत विनामूल्य अत्यावश्यक वस्तू पोचविण्याचा निर्णय घेतला आहे. शिवाजीनगर मुख्यालयात पोलिसांचे लष्कराच्या धर्तीवर स्वतःचे कॅन्टीन आहे. येथे सवलतीत त्यांना घरगुती वस्तू मिळतात.

दररोज रेशन, कांदा, बटाटा, सॅनिटायझर यासारख्या विनामूल्य वस्तू पोलिस कुटुंबीयांना घरपोच दिल्या जाणार आहेत. दरम्यान, करोनाच्या पार्श्वभूमीवर आपण सर्वांनी कोणती खबरदारी घेतली पाहिजे, संसर्ग रोखण्यासाठी काय उपायोजना केल्या पाहिजेत, याबाबत सह पोलिस आयुक्त डॉ. रवींद्र शिसवे आणि अपर पोलिस आयुक्त गुन्हे अशोक मोराळे यांनी स्वारगेट व सोमवार पेठेतील पोलिस वसाहतीत जाऊन मार्गदर्शन केले. सर्व पोलिस वसाहतीतील नागरिकांनादेखील सूचना देण्यात आल्या असून करोनाबाबतच्या जनजागृतीपर पोस्टर लावण्यात आली आहेत.

## Prabhat 11.05.20

८



# पोलिसांनाही 'सोशल डिस्टन्सिंग'चे बंधन

### करोना संक्रमणापासून बचावासाठी गृहविभागाकडून नियमावली जाहीर

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १० - ग्रामिण भागाच्या तुलनेत राज्यातील काही ठरावीक शहरात करोनाचा प्रादुर्भाव जास्त आहे. अशा कठीण प्रसंगातदेखील पोलिसांना त्यांचे कर्तव्य पार पाडावे लागते. कर्मचाऱ्यांना संसर्ग होऊ नये म्हणून पोलीस विभागाकडून सर्व प्रकारची प्रतिबंधात्मक काळजी घेतली जाते. मात्र, तरीदेखील काही पोलिसांना करोनाची बाधा झाली.

करोनाचा संसर्ग रोखण्यासाठी पोलीस, आरोग्य विभाग, प्रशासन युद्ध पातळीवर प्रयत्न करत आहे. नागरिकांनी अनावश्यक घराबाहेर पडू नये म्हणून २४ तास पोलीस रस्त्यावर उभे राहून खडा पहारा देत आहेत. बंदोबस्तादरम्यान अनेक पोलिसांना करोनाची लागण झाली आहे. त्यामध्ये काही पोलिसांचा मृत्यूदेखील झाला आहे. त्यामुळे गृहविभागाकडून पोलिसांच्या सुरक्षिततेसाठी काम करताना कोणती काळजी घ्यावी, नेमक्या काय उपाययोजना करण्यात याव्यात याबाबतची नियमावली जाहीर केली आहे. त्यानुसार काम करण्याचे निर्देश दिले आहेत.

### पोलीस ठाणे कामकाज, गुन्हे दाखल, तपास प्रक्रिया

- पत्रव्यवहारासाठी कमीत कमी कागदाचा वापर करावा. ई-मेल व ऑनलाइन साधनांचा वापर जास्तीत करावा. तर, स्मार्ट फोनद्वारे पोलीस नियंत्रण कक्षास दिलेली माहिती हीच प्रथम माहिती समजून योग्य चौकशी व तपास करावा.
- गस्त घालण्यासाठी ड्रोनचा वापर करावा.
- सीसीटीव्ही, थर्ड आय सारख्या तंत्रज्ञानाचा वापरदेखील गस्तीसाठी करावा.
- गुन्हे घडू नये म्हणून सामाजिक प्रबोधन करावे. तसेच दाखल गुन्हे हे कोर्टात सुनावणीस योग्य नाहीत हे तपासअंती कोर्टाकडून मंजूर करू घ्यावे. सरसकट आरोपपत्र दाखल करू नये.

### आरोपी अटक व कोठडीबाबत नियमावली

- सर्वोच्च न्यायालयाच्या मार्गदर्शक तत्त्वाचा वापर करून निवडक गुन्ह्यांतच आरोपीला अटक करावी.
- प्रथम आरोपीला सॅनिटायझरच्या टनेलमधून प्रवेश देऊन निर्जंतुकीकरण करावे. त्यानंतर आरोपीचे थर्मल गनद्वारे शरीराचे तापमान तपासावे. आरोपीची वैद्यकीय तपासणी करावी. त्याला करोनाची कोणती लक्षणे नाहीत ना याचा अभिप्राय डॉक्टरांकडून घ्यावा. अटक केल्यानंतर आवश्यक तेवढीच पोलीस कोठडी देण्याची मागणी कोर्टाकडे करावी.
- लॉकअप गार्ड व प्रभारी अधिकारी यांची दोन तासांनी आरोपीची तपासणी करून घ्यावी. पोलीस कोठडीत सुरक्षित अंतर राखण्याचे नियम सक्तीने पाळण्यास सांगावे. तसेच, आरोपीला एकाच थाळीतून जेवण द्यावे. त्याची थाळी दुसऱ्या आरोपीला वापरू नये.

### पोलीस ठाण्यात येणारे तक्रारदार, प्रक्रियाबाबत

- तक्रारदाराला पोलीस ठाण्याच्या प्रवेशद्वारातील निर्जंतुकीकरण टनेलमधून प्रवेश द्यावा. त्याने तोंडाला मास्क घातला असेल तरच आतमध्ये प्रवेश द्यावा, अन्यथा त्याच्यावर कायदेशीर कारवाई करावी.
- तक्रारदाराशी सुरक्षित अंतर ठेऊनच संवाद साधणे गरजेचे. सध्या पोलीस चौक्या बंद असून सर्व तक्रारदार यांना पोलीस ठाण्यातच येण्यास सांगावे व तेथूनच कामकाज करावे. त्यासाठी संबंधीत फोननंबर जाहीर करावा.
- तक्रार नोंदविण्यासाठी पोलीस ठाण्याबाहेर फोन क्रमांक फलकावर लावावेत.
- अतिमहत्त्वाच्या व दखलपात्र तक्रारी सोडून इतर तक्रारींसाठी फोनवर संपर्क करण्यास सांगावे. त्यामुळे मोबाइल क्रमांक व फोन क्रमांक ठळकपणे जाहीर करावेत.
- तक्रारदारांना आवारात विनाकारण रेंगाळत थांबू देऊ नये. एकावेळी एकाच तक्रारदाराला प्रवेश द्यावा. त्याच्यासोबतच्या व्यक्तीला बाहेर थांबण्यास सांगावे. सुरक्षित अंतर ठेऊन तक्रार घ्यावी.

### पोलीस ठाणे, मनुष्यबळ-स्वच्छता, आरोग्य व सुरक्षितता नियम

- कर्तव्यावर असताना पोलिसांनी मास्क, गॉगल व फेसशिल्ड नियमित वापर करावा. तर कंटेन्मेंट झोनमध्ये काम करताना विशेष काळजी घ्यावी.
- सर्व पोलीस ठाण्यांच्या वरिष्ठ निरीक्षकांनी पोलीस ठाण्यात सॅनिटायजर उपलब्ध करून द्यावे. प्रवेशद्वारावर निर्जंतुकीकरणाचे टनेल असावे.
- ठाण्यातील साहित्य वेळोवेळी निर्जंतुकीकरण केल्याची खात्री करावी. रजिस्टर, अभिलेख कमीत कमी हाताळावेत. कामाच्या व विश्रांतीच्या ठिकाणी सुरक्षित अंतर राखावे. अनोळखी व्यक्तीकडून येणारे खाद्यपदार्थ जेवणाचे पॅकेट घेणे बंद करावे.
- पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी एकमेकांचे साहित्य (मोबाइल, काठी, रुमाल, पाणी बॉटल, शस्त्र) वापरू अथवा हाताळू नये. स्वच्छता गृह व वॉशबेसीन दिवसातून दोन वेळा निर्जंतुकीकरण करावे. तसेच, सुरक्षित अंतर व आरोग्य सुरक्षाबाबतचे फलक पोलीस ठाण्यात लावावेत.

## Pudhari 16.05.20



- आता राज्यभर पोलिसांसाठी स्वतंत्र कोरोना मदत कक्ष
- शहरात दोन वरिष्ठ पोलिस निरीक्षकांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक

### पाहा असे चालते काम

# कोरोनाग्रस्त पोलिसांना आता तत्काळ मिळणार मदत

पुणे : पुढारी वृत्तसेवा

## Prabhat 24.04.20

### रक्षणकर्त्यांचे संरक्षण...



**पुणे :** पोलिसांनाही करोना संसर्ग झाल्याची प्रकरणे समोर आली. त्यावर भारतीय जैन संघटना, फोर्स मोटर्स, सिद्धिविनायक मित्र मंडळ आणि शिवसेना प्रभाग क्रमांक २ यांच्या वतीने विश्रांतवाडी पोलिसांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

## Pudhari 19.05.20



पोलिसांची कोरोना स्क्रीनिंग तपासणी करताना डॉक्टर.

# उत्तमनगर पोलिसांची कोरोना स्क्रीनिंग

**Loksatta 26.05.20**

# पोलिसांसाठी करोना मदत कक्ष

## आयुक्तालये, मुख्यालयात कक्ष कार्यान्वित

लोकसत्ता प्रतिनिधी

पुणे : राज्यातील एक हजारपेक्षा जास्त पोलीस कर्मचाऱ्यांना करोनाची बाधा झाली आहे. अशा परिस्थितीत पोलीस तसेच त्यांच्या कुटुंबीयांना तत्काळ मदत उपलब्ध करून देण्यासाठी पोलीस दलाने पाऊले उचललेली आहेत. राज्यातील सर्व पोलीस आयुक्तालये तसेच ग्रामीण पोलीस मुख्यालयात करोना मदत कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे.

राज्यातील सर्व पोलीस आयुक्तालये, जिल्हा पोलीस मुख्यालये, लोहमार्ग पोलीस मुख्यालये अशा एकूण मिळून ४८ ठिकाणी ६३ पेक्षा जास्त पोलीस अधिकाऱ्यांची समन्वय अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली. राज्यातील वेगवेगळ्या भागात बंदोबस्तासाठी असलेल्या पोलिसांना करोनाची बाधा होणे, त्यांच्या संपर्कात आलेल्या पोलिसांचे विलगीकरण केल्याबाबतची माहिती दैनंदिन अहवाल स्वरूपात दररोज मुंबईतील पोलीस महासंचालक कार्यालयात पाठविण्यात येत आहे.

सेवा बजावताना पोलीस, आरोग्य क्षेत्रातील कर्मचारी, वैद्यकीय तज्ज्ञ थेट करोनाबाधितांच्या संपर्कात येत आहेत. अशा परिस्थितीत पोलिसांना करोनाच्या संसर्गाला अटकाव घालण्याबाबत आवश्यक ती साधने पुरविण्यात येत आहेत. मुखपट्टी, जंतुनाशके, घरी पोहचल्यानंतर घ्यावयाची काळजी, कुटुंबीयांची घ्यावयाची काळजी याबाबत काही मार्गदर्शक सूचना करण्यात आल्या आहेत. पुणे पोलीस दलात अशा करोना मदत कक्ष कार्यान्वित करण्यात आला असून शिवाजीनगर पोलीस मुख्यालयाचे पोलीस उपायुक्त वीरेंद्र मिश्र समन्वय अधिकारी म्हणून काम पाहत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस आयुक्त मिलिंद पाटील, पोलीस निरीक्षक भास्कर जाधव या कक्षाचे काम पाहत आहेत. पुणे पोलीस दलातील २२ पोलीस करोनाबाधित झाले होते. त्यापैकी दहा जणांना उपचारानंतर सोडून देण्यात आले आहे. करोनाबाधित सहायक फौजदाराचा काही दिवसांपूर्वी मृत्यू झाला होता.

> बी. जे. वैद्यकीय महाविद्यालयाकडून करण्यात आलेल्या एका सर्वेक्षणात शहरातील बहुतांश पोलिसांना करोना संसर्गाला अटकाव कसा घालावा, काय काळजी घ्यावी याची माहिती असल्याचे समोर आले. करोनाबाधित पोलीस तसेच त्यांच्या कुटुंबीयांना तातडीने वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्यासाठी कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे.
>
> – डॉ. के. वेंकटेशम, पोलीस आयुक्त, पुणे

**Samana 30.05.20**

# पोलिसांसाठी आता दोन रुग्णवाहिका

पुणे, दि. २९ (प्रतिनिधी) – कोरोनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस दलातील आजारी कर्मचाऱ्यांसह त्यांच्या कुटुंबीयांना रुग्णालयात घेऊन जाण्यासाठी दोन रुग्णवाहिका उपलब्ध ठेवण्यात आल्या आहेत. त्याबाबतचे आदेश पोलीस प्रशासनाने मोटार परिवहन विभागाला दिले आहेत. दोन दिवसांपूर्वी एका महिला कर्मचाऱ्यास रुग्णवाहिका मिळाली नव्हती. त्यासंदर्भात दै. 'सामना'ने वृत्त प्रकाशित केले होते. त्यानुसार आता रुग्णवाहिकेची सोय करण्यात आली आहे.

**प्रशासनाचे मोटार परिवहन विभागाला आदेश**

दोन दिवसांपूर्वी वाहतूक विभागात नेमणुकीस असलेल्या एका महिला कर्मचाऱ्यास रुग्णवाहिका न मिळाल्याने तब्बल ५ तास रुग्णालयात जाता आले नाही. त्यांनी नियंत्रण कक्षाशीदेखील संपर्क साधला होता. मात्र, तरीही त्यांना ताटकळत थांबावे लागले होते. याची दखल वरिष्ठांकडून घेण्यात आली आहे. त्यानुसार आता शहरातील पोलीस अधिकारी आणि कर्मचाऱ्यांसाठी दोन रुग्णवाहिका उपलब्ध करण्यात आल्या आहेत. पोलिसांसह त्यांच्या कुटुंबीयांसाठी २४ तास विनामूल्य रुग्णवाहिकेची सेवा देण्यात येणार आहे.

रुग्णवाहिकेची जबाबदारी नियंत्रण कक्षाला देण्यात आली आहे. नियंत्रण कक्षाशी संपर्क साधल्यानंतर उपलब्ध प्रभारी अधिकारी मोटार परिवहन विभागाशी संपर्क करून रुग्णवाहिक पाठविण्याची सूचना करणार आहे. मोटार परिवहन विभागाने तत्काळ जाऊन संबंधित रुग्णाला रुग्णालयात घेऊन जायचे आहे. काही अडचण आल्यास सहायक आयुक्त सतीश गोवेकर, पोलीस निरीक्षक भास्कर जाधव यांच्याशी संपर्क साधायचा आहे. पोलीस कर्मचाऱ्यांसाठी स्वतंत्र रुग्णवाहिक उपलब्ध करून देण्यात आल्याने अनेकांनी समाधान व्यक्त केले आहे.

**Prabhat 18.05.20**

# पोलिसांसाठी राज्यभरात करोना मदत कक्ष सुरू

प्रभात वृत्तसेवा

पुणे, दि. १७ - राज्यात आतापर्यंत हजारावर पोलीस अधिकारी व कर्मचाऱ्यांना करोना संसर्ग झाला आहे. या पार्श्वभूमीवर आता राज्यभर पोलिसांसाठी स्वतंत्र करोना मदत कक्ष कार्यान्वित करण्यात आला आहे. यामुळे जर एखाद्याला करोना संसर्ग झाला, तर पोलीस कुटुंबीयांना नोडल अधिकाऱ्यांशी संपर्क साधून तात्काळ वैद्यकीय उपचार उपलब्ध होण्यास मदत होणार आहे.

राज्यातील सर्व पोलीस आयुक्तालये, जिल्हा पोलीस




मुख्यालये, लोहमार्ग पोलीस मुख्यालये अशा तब्बल ४८ ठिकाणी ६३ पेक्षा अधिक पोलीस अधिकाऱ्यांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे. दिवसभरात करोनाच्या संदर्भातील सर्व माहिती प्रत्येक दिवशी पोलीस महासंचालक कार्यालयाला पाठविण्यात येते.

पुणे शहर पोलीस दलासाठी पोलीस उपायुक्त मुख्यालय विरेंद्र मिश्रा, वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुनील तांबे, सरदार पाटील हे नोडल अधिकारी म्हणून काम पाहत आहेत. शहर पोलीस दलात आतापर्यंत २२ जणांना कोरोनाची लागण झाली असून, त्यापैकी दहा जण बरे झाले आहेत. तर एकाचा मृत्यू झाला आहे. त्यांच्या संपर्कात आलेल्या ३१६ जणांना होम क्वारंटाइन करण्यात आले आहे.

### अशी होते तपासणी

पोलीस दलातील एखाद्या व्यक्तीला जर करोनासदृश्य लक्षणे दिसली, तर प्रथम शिवाजीनगर मुख्यालयातील फिवर रुग्णालयात संबंधिताची प्राथमिक तपासणी होते. त्यानंतर जर करोनाची लक्षणे दिसली, तर संबंधित व्यक्तीला पोलिसांसाठी आरक्षित रुग्णालयात उपचारासाठी पाठवले जाते. पुढे त्यांच्या घरातील तसेच शेजारी, संपर्कात आलेल्या कर्तव्याच्या ठिकाणावरील सहकारी या सर्वांची प्राथमिक तपासणी करून क्वारंटाइन केले जाते. यासर्व प्रक्रियेवर नियुक्त करण्यात आलेले नोडल अधिकारी पूर्णवेळ लक्ष ठेवून असतात.

## Prabhat 16.05.20



**पुणे :** करोनाविरुद्ध लढण्यासाठी राज राणावत आणि सुभाष राणावत यांनी पुढाकार घेत शहरातील सर्व पोलीस ठाणे आणि त्यांच्याशी संबंधित कर्मचाऱ्यांसाठी ५१ इन्फ्रारेड थर्मोमीटर सुपुर्द केले आहेत. या उपकरणांची किंमत सुमारे सुमारे ३ लाख ६० हजार रुपये इतकी आहे. पोलिसांच्या आरोग्य तपासणीसाठी या उपकरणाचा उपयोग होणार आहे.

## Pudhari 22.05.20

### बिहारी मजूर कुटुंबे रवाना



लॉकडाऊनमुळे पुण्यात अडकून पडलेल्या मजूर कुटुंबांना बिहारला त्यांच्या मूळगावी जाता यावे म्हणून कोंढवा पोलिस स्टेशनवरून सोशल डिस्टन्सिंगचे पालन करीत ओळखपत्र तपासणी केल्यानंतर पुणे रेल्वे स्टेशनकडे रवाना करण्यात आले.

## Pudhari 03.05.20



### पोलिसांना ५१ थर्मोमीटर भेट

पुणे : कोरोनाच्या पार्श्वभूमीवर राज राणावत व सुभाष राणावत या दोघांनी दररोज पोलिसांची पूर्व तपासणी करताना मदत व्हावी म्हणून साडेतीन लाख रुपये किमतीचे ५१ थर्मोमीटर भेट दिले आहेत. सह पोलिस आयुक्त डॉ. शिसवे व अपर पोलिस आयुक्त अशोक मोराळे यांच्याकडे ते सुपूर्द करण्यात आले. कोरोनाचा सामना करताना पोलिसांना कोरोनाची लागण होऊ नये म्हणून काळजी घेतली जात आहे. तसेच प्रतिबंधात्मक साधने पुरवली जात आहेत. मात्र दुर्दैवाने काही कर्मचाऱ्यांना कोरोनाची लागण झाली. त्यामुळे प्रशासनाकडून दररोज कर्तव्यावर हजर होणाऱ्यांची तपासणी केली जाते. त्यामध्ये ऑक्सिवॉच मशिन व थर्मोमीटरद्वारे शरीराचे तापमान आणि ऑक्सिजनची पातळी तपासली जाते.

## Prabhat 01.05.20

### पोलिसांसाठी मोफत रुग्णवाहिका

**पुणे :** कोरोनामुळे पोलिस अधिकारी, कर्मचारी, कुटुंबीयांसाठी मोटार परिवहन विभाग शिवाजीनगर येथे दोन रुग्णवाहिका मोफत चोवीस तास उपलब्ध करून दिल्या आहेत. ०२० - २६२०८२५० क्रमांकावर संपर्क केल्यानंतर रुग्णवाहिका उपलब्ध होणार आहे.

शहर पोलिस आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली या रुग्णवाहिका उपलब्ध करून दिल्या आहे. एक रुग्णवाहिका पोलिस कुटुंबीयांसाठी तर दुसरी संसर्ग झालेल्यांच्या संपर्कात आलेल्यांच्या विलगीकरणासाठी आहे.

## Pudhari 31.05.20

### पोलिसांसाठी रुग्णालयात खाटा राखीव

करोनाच्या संसर्गाला अटकाव घालण्यासाठी शहर पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी आणि कर्मचारी रस्त्यावर उतरले आहेत. गेल्या महिनाभरापासून शहरात अहोरात्र बंदोबस्तात गुंतलेल्या पोलीस दलातील काही कर्मचारी करोनाबाधित असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर करोनाबाधित पोलिसांसाठी रुग्णालयातील खाटा राखीव ठेवण्याची विनंती करण्यात येणार आहे. याबाबत विभागीय आयुक्त डॉ. दीपक म्हैसेकर यांच्याबरोबर पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी नुकतीच चर्चा केली. डॉ. म्हैसेकर करोनाबाधित पोलिसांसाठी रुग्णालयातील खाटा राखीव ठेवण्याचे आदेश लवकरच देणार आहेत.

**Pudhari 29.05.20**

## पोलिस व्हॅनचे निर्जंतुकीकरण




कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने पोलिसांकडूनही खबरदारी घेतली जात आहे. गुरुवारी शिवाजीनगर जुना बाजार चौकात व्हॅनचे निर्जंतुकीकरण करताना कर्मचारी.

**Lokmat 08.06.20**

# 'बंदोबस्तासह स्वत:ची काळजी घ्या'

## गृहमंत्री अनिल देशमुख : पाहणी भेटीदरम्यान पोलिसांना सल्ला

लोकमत न्यूज नेटवर्क

येरवडा : राज्यात कोरोना आजाराचा वाढता प्रादुर्भाव लक्षात घेता स्वत:च्या कुटुंबापासून दूर राहणाऱ्या पोलिसांनी बंदोबस्तावर स्वत:च्या आरोग्याचीदेखील काळजी घ्यावी, अशी सूचना गृहमंत्री अनिल देशमुख यांनी केली.

येरवडा येथील पुणे महापालिकेच्या कोरोना तपासणी केंद्राला गृहमंत्री देशमुख यांनी रविवारी दुपारी भेट दिली. यावेळी बंदोबस्तावर असणाऱ्या अधिकारी व कर्मचारी यांच्याशी त्यांनी संवाद साधून विचारपूस देखील केली. येरवडा पोलीस स्टेशन येथील पोलीस शिपाई गोविंद कोळेकर, पोलीस मुख्यालय येथील पोलीस शिपाई तेजस कुंभार, महिला पोलीस कर्मचारी निशा शिंदे यांची गृहमंत्री देशमुख यांनी चौकशी केली.

आमदार सुनील टिंगरे, माजी उपमहापौर व नगरसेवक डॉ. सिद्धार्थ धेंडे, नगरसेवक अविनाश साळवे, पोलीस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम, अतिरिक्त महापालिका आयुक्त रुबल अग्रवाल, अपर पोलीस आयुक्त सुनील फुलारी, पोलीस उपायुक्त पंकज देशमुख, सहायक पोलीस आयुक्त मिलिंद चौधरी, लुंकड रिअल्टीचे अमित लुंकड, पोलीस निरीक्षक युनूस शेख, गुन्हे निरीक्षक अजय वाघमारे उपस्थित होते. राज्याचे गृहमंत्री अनिल देशमुख यांनी स्वत: चौकशी केल्यामुळे बंदोबस्तावरील पोलिसदेखील काही वेळ भारावून गेले होते.



राज्याचे गृहमंत्री अनिल देशमुख यांनी येरवडा कंटेन्मेंट झोन येथील बंदोबस्तातील पोलिसांशी संवाद साधून त्यांची विचारपूस केली.

### सॅनिटायझर, मास्कचा वापर करा

- पोलीस दलातील या कोरोना योद्ध्यांबरोबर संवाद साधताना सॅनिटायझर वापरत जा. मास्कचा वापर करा. आवश्यकता असल्यास तत्काळ तपासणी व योग्य ते औषधोपचार घ्या. बंदोबस्ताचे वेळी स्वत:ची काळजी घ्या, अशा सूचना गृहमंत्र्यांनी पोलीस कर्मचाऱ्यांना केल्या.